# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### सोलापूर जिल्हयातील प्राथमिक शिक्षकांच्या रिक्त जागा भरण्याबाबत

**(१) ३००९ (२२-१२-२०१५). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयामध्ये प्राथमिक शिक्षकांची सुमारे ४०० पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सांगोले तालुक्यामध्ये त्यापैकी १०० प्राथमिक शिक्षकांची पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पदे रिक्त ठेवण्याची कारणे काय आहेत, उक्त पदे केव्हा भरण्यात येतील,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

सांगोले तालुकयामध्ये प्राथमिक शिक्षकांची ७३ पदे रिक्त आहेत.

(३) सांगोले तालुकयातील प्राथमिक शिक्षकांची पदे प्राथमिक शिक्षकांच्या बदल्यांमुळे, सेवानिवृतीमुळे तसेच पदोन्नतीमुळे रिक्त झालेली आहेत. सदर रिक्त पदे आंतर जिल्हा बदलीने, अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाने भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील खेळाडूंना शासकीय व निमशासकीय सेवेत ५ टक्के आरक्षणाची तरतूद असतांनाही विद्यापीठाच्या अनेक पदक प्राप्त खेळाडुंना शासनाच्या सेवेत घेताना अपात्र ठरविण्यात आल्याबाबत**

**(२) ५१९४ (०९-४-२०१५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खेळाडुंना शासकीय व निमशायकीय सेवेत ५ टक्के आरक्षण तरतूद असतांनाही सन २०११ साली झालेल्या आंतरविद्यापीठ हॅण्डबॉल स्पर्धेत सुवर्ण पदक प्राप्त खेळाडू राजू जाधव यासह विद्यापीठाच्या अनेक खेळाडूंना अध्यादेशाचा वेगळा अर्थ काढून शासनाच्या सेवेत घेताना अपात्र ठरविण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चोकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार विद्यापीठाच्या सुवर्ण पदक प्राप्त खेळाडूंना शासकीय-निमशासकीय सेवेची संधी उक्त आरक्षणाच्या माध्यमातून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०२-१२-२०१५)** :(१) व (२) अत्युच्च गुणवताधारक खेळाडूंना शासकीय/निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी आरक्षण देण्यासंदर्भात दिनांक २०.९.२०१३ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयातील तरतूदीच्या अनुषंगाने काही खेळांडूना शासनाच्या सेवेत घेताना अपात्र ठरविण्यात आले होते. तथापि या प्रकरणी संबंधित खेळाडूंनी मा. न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेच्या अनुषंगाने मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार श्री. राजू जाधव व इतर खेळाडूंची प्रमाणपत्रे पडताळणी करुन देण्यात आली असून त्याबाबतचा अहवाल संबंधिताकडे पाठविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे पत्रकारांना वैद्यकीय सेवा पुरविण्याबाबत**

**(३) ५८५५ (०९-०४-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे पत्रकारांना देखील वैद्यकीय सेवा पुरविल्या जाणार असल्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री यांनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान जाहिर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पत्रकारांना वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी शासन त्यांना काही निकष लागू करणार आहे काय, असल्यास, सदरील निकषांचा तपशील काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (११-१२-२०१५) :**(१) शासकीय व निमशासकीय कर्मचा-याप्रमाणे पत्रकारांना देखील वैद्यकीय सेवा पुरविण्याची बाब तपासण्यात येईल, असे माननिय मंत्री वैद्यकीय शिक्षण यांनी जाहीर केले होते.
(२) त्यानुषंगाने, संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील शिक्षकांची पदे रिक्त झाल्याने त्याचा अधिभार मुख्याध्यापकांवर पडल्याबाबत**

**(४) ६७२० (०९-०४-२०१५). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने दिनांक २० नोव्हेंबर, २०१३ च्या नियमानुसार शिक्षण हक्क कायद्यानुसार संचमान्यतेच्या आधारे प्रत्येक तुकड्यानुसार विद्यार्थी शिक्षकांचे प्रमाण ठरविल्यामुळे ग्रामीण, आदिवासी व शहरी भागाच्या सरसकट पध्दतीने पाचवीच्या वर्गासाठी ३० विद्यार्थ्यांसाठी एक शिक्षक तर सहावी ते आठवी वर्गासाठी ३५ विद्यार्थ्यांमागे एका शिक्षकांची नियुक्ती करण्याच्या शासन निर्णयामुळे संपुर्ण राज्यात ५० ते ६० हजार शिक्षक अतिरीक्त असून शिक्षकेत्तरांची पदे रद्द झाल्यामुळे प्राथमिक कामाचा भारही शिक्षक व मुख्याध्यापकांवर पडला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-११-२०१५) :**(१) दि. २० नोव्हेंबर, २०१३ च्या शासन निर्णय अधिक्रमित करुन दि. २८.८.२०१५ च्या शासन निर्णयान्वये नवीन तरतूदी लागू करण्यात आल्या आहेत.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील दुध भेसळ रोखण्याकरिता शासकीय प्रयोगशाळा अत्याधुनिक करण्याबाबत**

**(५) ७५११ (०६-०४-२०१५). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मोठया सहकारी व खाजगी दुध संघाच्या प्रयोगशाळा आधुनिक व प्रगतशील

असून त्यांच्या तुलनेत राज्य शासनाच्या प्रयोगशाळांची यंत्रणा अतिशय जुनी आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, पुणे शहरात दुध व दुग्धजन्य पदार्थांबरोबरच इतर अन्न पदार्थांमधील भेसळ ओळखण्याकरिता स्वतंत्र प्रयोगशाळा उभी करण्याचा निर्णय माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान घेतला, हे खरे आहे काय,

(३) तसेच, शहरी भागात त्यातही मुंबईमध्ये दुध भेसळ मोठया प्रमाणात होत असल्यामुळे सदर प्रयोगशाळांचा दर्जा सुधारण्यासाठी व अत्याधुनिक करण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, प्रश्न भाग (२) मधील प्रयोगशाळा उभी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (११-१२-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) पुणे येथे बांधकामाकरीता ताब्यात घेण्यात आलेल्या भुखंडावर बांधकामास काही कालावधी लागणार असून पुणे येथे अन्न नमुने चाचणी प्रयोगशाळेसाठी जागा भाड्याने घेण्यास प्रशासकीय मंजूरी देण्यात आली आहे.

(३) महाराष्ट्रातील दूध भेसळ रोखण्यासाठी सर्वप्रथम मुंबई शहरातील अन्न चाचणी प्रयोगशाळेचे बळकटीकरण करण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने प्रयोगशाळेसाठी अत्यंत आवश्यक असणाऱ्या तांत्रिक व प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पदांचा प्रस्ताव तसेच सदर प्रयोगशाळेचे अत्याधुनिकीकरण करण्यासाठी आवश्यक आधुनिक उपकरणे खरेदीचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे.

(४) पुणे येथे अन्न नमुने प्रयोगशाळेसाठी जागा भाड्याने घेण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तसेच त्याबाबतच्या पदनिर्मितीची बाब विचारधीन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील वायु व ध्वनी प्रदूषणाला प्रतिबंध घालण्याबाबत

**(६) ९८०१ (०६-०४-२०१५). श्री.संजय पोतनीस (कलिना), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अजित पवार (बारामती), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील औदयोगिक कारखाने आणि वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे वायुप्रदूषण दिवसेंदिवस वाढत असल्याचे केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मानकांबरोबर तुलना केली

असता सदर वायुप्रदूषण नागरिकांच्या आरोग्यासाठी घातक असल्याचे दिसून आल्याचे माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच मुंबईत वाहनांची संख्या वाढत असल्याने तसेच उद्योगधंदे, कायमस्वरुपी लावण्यात आलेले लाऊडस्पीकर, खेळाची मैदाने, क्रीडांगणे, शाळा, महाविद्यालये, रुग्णालय, रेल्वे स्थानक याबरोबरच विविध सार्वजनिक ठिकाणी सुरु असलेल्या गोंगाटामुळे ध्वनीप्रदूषणाची पातळी वाढली असल्याचे केंद्रीय प्रदूषण मंडळाने केलेल्या पाहणीत नुकतेच आढळून आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई शहरातील वरळी, वांद्रे आणि सायन, परळ येथे केलेल्या सर्वेक्षणात सर्वच केंद्रावर तरंगत्या धुलकणांची पातळी मानकांपेक्षा वाढलेली निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर वायु व ध्वनी प्रदूषणाला प्रतिबंध घालण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२९-१०-२०१५) :**(१) व (२) हे अंशत: खरे आहे.
(३) व (४) मुंबईत वाहनांची संख्या वाढली आहे तसेच ध्वनी प्रदूषणाची पातळी वाढली आहे ही वस्तुस्थिती आहे. वाहनांत कमी प्रदूषणकारी इंधनांचा उपयोग करणे (भारत IV) तसेच ध्वनी प्रदूषणाला आळा घालण्यासाठी हॉर्न व सायरन यांची मर्यादा निश्चित करण्यात आलेली आहे. तसेच काही ठिकाणी रस्त्यांच्या कडेला ध्वनी प्रतिबंधक संयत्रणा बसविलेली आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शासकीय परिचारिकांच्या विविध मागण्यांबाबत**

**(७) ९८८६ (०९-०४-२०१५). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शासकीय परिचारिकांनी, वेतनवाढ, विविध भत्ते, सुट्टया, गणवेश, निवासस्थान व रुग्णालयातील रिक्त जागा इत्यादी विविध मागण्यांचे दिनांक १७ व १८ जानेवारी, २०१५ रोजी आयोजित केलेल्या राज्यस्तरीय परिषदेत जे.जे.रुग्णालयाचे अधिष्ठाता यांच्याकडे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासकीय परिचारिकांच्या मागण्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार उक्त मागण्यांच्या संदर्भात शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-११-२०१५) :** (१) होय.

(२) संबंधित संघटनेच्या पदाधिका-यांशी दि.२४/०८/२०१५ रोजी बैठक आयोजित करुन शासकीय परिचारिकांच्या एकूण २१ मागण्यांपैकी त्यांच्या आर्थिक बाबीशी निगडीत मागण्या वगळून अन्य १० मागण्या मान्य करुन त्यासंदर्भात संबंधितांना तातडीने कार्यवाही करण्यास सूचना दिलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील केंद्र सरकार पुरस्कृत आय.सी.टी. योजनेअंतर्गत कार्यरत असलेल्या शिक्षकांना त्यांच्या कराराप्रमाणे वेतन व इतर सुविधांचा लाभ मिळणेबाबत**

**(८) ९९७१ (०९-०४-२०१५). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील केंद्र सरकार पुरस्कृत आय.सी.टी. योजने अंतर्गत कार्यरत असलेल्या शिक्षकांना त्यांच्या कराराप्रमाणे वेतन व इतर सुविधांचा लाभ मिळणेबाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक ८ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यादरम्यान लेखी पत्राव्दारे विनंती केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कोणतीच कार्यवाही न होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, योजनेअंतर्गत कार्यरत असलेल्या संबंधित शिक्षकांना त्यांच्या कराराप्रमाणे वेतन व इतर सुविधांचा लाभ त्वरीत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, साधारणत: कैंव्हापर्यंत उक्त कार्यवाही पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. विनोद तावडे (२०-११-२०१५) :**(१), (२) व (३) आयसीटी योजनेच्या टप्पा २ व ३ अंतर्गत एजन्सीबरोबर करण्यात आलेल्या करारनाम्यातील मुद्दा क्रमांक ८.१ नुसार सदर योजनेसाठी नेमण्यात आलेल्या संगणक निदेशकांना मानधन व अन्य सुविधा पुरविण्याची जबाबदारी संबंधित एजन्सीची आहे. एजन्सी प्रतिनिधींबरोबर बैठका घेऊन संगणक निदेशकांना करारानुसार मानधन व अन्य सुविधा पुरविणेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. योजनेच्या टप्पा ३ अंतर्गत किमान मानधनाबाबत करारामध्ये तरतूद करण्यात आली आहे.

---

**पुणे शहरातील खडकवासला, धनकवडी, तळजाई, वडगावशेरी, एरंडवणे परिसरातील महापालिकेच्या तसेच केजीपासून दहावीपर्यंतंच्या शाळा पत्र्याच्या शेडमध्ये भरत असल्याबाबत**

**(९) १२००७ (०९-०४-२०१५). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील खडकवासला, धनकवडी, तळजाई, वडगावशेरी, एरंडवणे परिसरात आजही पुणे महापालिकेच्या शाळा तसेच खाजगी इंग्रजी माध्यमाच्या केजीपासून दहावी पर्यंतच्या

शाळा पत्र्याच्या शेडमध्ये भरतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शिक्षण हक्क कायद्याची (आरटीई) अंमलबजावणी होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने पहाणी केली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार उक्त शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-१०-२०१५) :**(१) वडगावशेरी येथील इंग्रजी माध्यमाच्या एका खाजगी शाळेच्या एकूण वर्गापैकी तीन वर्ग पत्र्याच्या शेडमध्ये भरतात व धनकवडी येथील महानगरपालिकेची एक शाळा पत्र्याच्या शेडमध्ये भरते.

(२) शिक्षण हक्क कायद्यांतर्गत निकषांपैकी, पक्की इमारत हा निकष वगळता उर्वरित निकषांची पूर्तता होते.

(३) वडगावशेरी येथील इंग्रजी माध्यमाच्या खाजगी शाळेच्या इमारत बांधकामाबाबत वाद असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. धनकवडी येथील महानगरपालिकेच्या शाळेसाठी पक्की इमारत बांधण्याच्या अनुषंगाने संबंधित विभागाच्या समन्वयाने कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### नागपूर येथे आयआयएम व ॲम्सच्या धर्तीवर अद्यावत रुग्णालय सुरु करण्याबाबत

**(१०) १२७२२ (०८-०४-२०१५). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे आयआयएम व ॲम्सच्या धर्तीवर अद्यावत रुग्णालय सुरु करण्याचा शासनाचा विचार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालय सुरु करण्याबाबत सद्यस्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-११-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी नागपूर येथे मिहान येथील जागा ताब्यात घेण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुकुटबन, अडेगाव (ता.झरी-जामणी,जि.यवतमाळ) परिसरात डोलोमाईटच्या ब्लास्टिंगमुळे शेतपिकांचे नुकसान होत असल्याबाबत**

**(११) १३७१३ (०६-०४-२०१५). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुकुटबन, अडेगाव (ता.झरी-जामणी,जि.यवतमाळ) परिसरात विविध कंपन्यांनी डोलोमाईट कंपन्या सुरु केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच चिखलगाव (ता.वणी, जि.यवतमाळ) व नजिक शहराजवळ सुमारे ६२ कोलडेपो असून सदर डेपोमध्ये वेकोलीच्या विविध खाणीतून येणाऱ्या कोळशाची साठवणूक होत असल्याने वाहनांच्या होणाऱ्या वर्दळीमुळे कोळश्याचे बारिक कण हवेत पसरल्याने तेथील नागरिकांना वायु प्रदुषणाचा सातत्याने त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चिखलगाव नजिकच्या लाल पुलीया कोळसा डेपो हटविण्याबाबत तेथील नागरिकांनी अनेकदा तक्रारी करूनसुध्दा सदर डेपो हटविला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रदुषणासंदर्भात राष्ट्रीय हरित लवाद, पुणे यांनी संबंधित यंत्रणेला कारवाई करण्याचे आदेश किंवा उपाययोजनेच्या सूचना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर कंपन्यातील निघणा-या दुषित धुरामुळे व अवैधरीत्या होत असलेल्या डोलोमाईटच्या ब्लास्टिंगमुळे शेतक-यांच्या पिकांचे नुकसान होत असून शेतकरी व शेतमजुरांचे, नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून स्थानिक शेतक-यांनी तहसिलदार, पोलीस ठाणे व जिल्हाधिकारी यांच्याकडे होणाऱ्या नुकसानीबाबत तक्रार सादर केली असून अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रामदास कदम (२९-१०-२०१५) :** (१) ते (४) हे खरे आहे.

(५) एम.आय.डी.सी. वणी, उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, वणी व ग्रामपंचायत, चिखलगाव या ठिकाणी हवेची गुणवत्ता तपासणी केंद्र कार्यान्वित करण्यात आलेली आहेत. मा.राष्ट्रीय हरीत लवाद, पुणे यांच्या आदेशाच्या अनुषंगाने मा.जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी वणी, जि.यवतमाळ प्रदूषणसमस्या संबंधित अनुपालन करण्याकरीता उपविभागीय अधिकारी, वणी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केलेली आहे.तसेच मा.जिल्हाधिकारी,यवतमाळ यांनी मा.राष्ट्रीय हरीत लवाद, पुणे यांच्या आदेशाच्या अनुषंगाने दिनांक १२/११/२०१४ तसेच दिनांक २०/१/२०१५ रोजी बैठक आयोजित करुन आढावा घेतलेला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील गोपाळपूर रोडवरील तालुका क्रीडा कार्यालयाल मागील एक वर्षापासून क्रीडा अधिकारी नसल्यामुळे बंद करण्यात आल्याबाबत**

**(१२) १३७७७ (१९-०४-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील गोपाळपूर रोडवर क्रीडा व युवक कल्याण संचालनालयाच्या वतीने सुरु करण्यात आलेल्या तालुका क्रीडा कार्यालयास मागील एक वर्षापासून क्रीडा अधिकारी नसल्यामुळे तालुका क्रीडा कार्यालय बंद करण्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुका क्रीडा कार्यालयात क्रीडा अधिकारी यांची त्वरीत नियुक्ती करण्याबाबत तसेच उक्त तालुका क्रीडा कार्यालय त्वरीत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०२-१२-२०१५) :**(१) नाही.

(२) व (३) तालुका क्रीडा अधिकारी कार्यालय, पंढरपूर येथील तालुका क्रीडा अधिकारी पदांचा अतिरिक्त कार्यभार जिल्हा क्रीडा अधिकारी सोलापूर कार्यालयातील क्रीडा अधिका-यांकडे सोपविण्यात आला आहे.

दिनांक २२ जानेवारी, २०१४ च्या शासन निर्णयान्वये ६९ तालुका क्रीडा अधिका-यांची नवीन पदे निर्माण करण्यात शासनाने मान्यता दिली असून या पदासाठी नव्याने निर्माण करावयाच्या जिल्हानिहाय तालुक्याच्या नावास मान्यता प्रदान करण्याची बाब शासनस्तरांवर तपासण्यात येते आहे.

---

**कोकणतील वाढल्या प्रदुषणामुळे पक्ष्यांची लक्षणीय प्रमाणत होत असलेलली घट**

**(१३) १४३०० (०६-०४-२०१५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील झपाटयाने उभारले जात असलेले मोठेमोठे रासायनिक प्रकल्प आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या प्रदुषणामुळे पक्ष्यांची लक्षणीय घट होत असल्याची माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्न भाग (१) बाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२९-१०-२०१५) :** (१) व (२) यासंदर्भात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्राप्त झालेल्या अभिप्रायानुसार कोकण विभागात विद्यमान औद्योगिक/व्यावसायिक प्रकल्पांमुळे दिवसेंदिवस वाढत असणाऱ्या शहरीकरणांमुळे पक्षांच्या

संख्येत घट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासंदर्भात संचालक, बॉम्बे नेचरल हिस्ट्री सोसायटी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अभिप्रायानुसार कोकण परिसरात रासायनिक प्रकल्प किंवा प्रक्रियेमुळे पक्ष्यांची संख्या घटत असणाऱ्या अभ्यास त्यांचेमार्फत करण्यात आलेला नाही. तथापि, त्यांची कोकण परिसरात डायक्लोफेन्याक (Diclofenac) या पशुवैद्यकीय क्षेत्रात वापरल्या जाणाऱ्या औषधामुळे गिधाडांची संख्या कमी झाल्याचे नमूद केले आहे. ही संख्या पूर्ववत करण्यास्तव विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयाच्या परिसरात चालविण्यात येणाऱ्या परिचारिका प्रशिक्षण महाविद्यालयाच्या पाहणीसाठी आलेल्या इंडियन नर्सिंग कौन्सिलच्या (आयएनसी) पाहणी पथकाला चुकीची माहिती दिल्याबाबत**

**(१४) १५२२० (०९-०४-२०१५). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयाच्या परिसरात चालविण्यात येणाऱ्या परिचारिका प्रशिक्षण महाविद्यालयाच्या पाहणीसाठी आलेल्या इंडियन नर्सिंग कौन्सिलच्या (आयएनसी) पाहणी पथकाला चुकीची माहिती देऊन अधिष्ठाता डॉ.अशोक राठोड, प्रभारी अधिष्ठाता व निवासी डॉक्टर यांनी केंद्रीय पथकाची दिशाभूल केल्याचा प्रकार माहे डिसेंबर, २०१४ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (२३-११-२०१५) :**(१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील तालुक्यात ऐकमेव अनुदानीत महाविद्यालय योजनेअंतर्गत महाविद्यालयांना वेतनेतर अनुदान मंजूर करण्यासह शिक्षणशुल्क आकारण्याची परवानगी देण्याबाबत**

**(१५) १६१९६ (०९-०४-२०१५). श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील तालुक्यात एकमेव अनुदानीत महाविद्यालय योजनेअंतर्गत शासन निर्णय दिनांक ५ ऑगस्ट, २०१० नुसार फक्त वेतन अनुदान मंजूर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, फक्त वेतन अनुदानावर असलेली महाविद्यालये ५ टक्के वेतनेतर अनुदानीत

महाविद्यालयासारखे शिक्षणशुल्क आकारण्याच्या अटीमुळे शिक्षणाचा दर्जा खालावला जाणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने या महाविद्यालयांना वेतनेतर अनुदान मंजूर करावे किंवा या संस्थाना पूर्ण शिक्षणशुल्क आकारण्याची परवानगी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-१२-२०१५) :** (१) होय.
(२) नाही. तथापि, तालुक्यातील एकमेव योजनेंतर्गत मंजूर झालेल्या महाविद्यालय/विद्याशाखांना ५ टक्के वेतनेतर अनुदान देण्याची किंवा शिक्षण शुल्क वगळता इतर शुल्क वाढवून देण्याची मागणी शासनाकडे करण्यात आलेली होती. त्यानुसार शासनाने क्र. अनुदा-२०१५/(४९/१५)मशि-४ दि.८ सप्टेंबर, २०१५ च्या शासनापत्रान्वये सर्व विद्यापीठांना कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील ऑर्थर रोड कारागृहात क्षमतेपेक्षा जास्त कैदी ठेवण्यात आल्याबाबत

**(१६) १६३११ (१०-०८-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील ऑर्थर रोड कारागृहात ८०० कैदांची क्षमता असताना २७०० हून अधिक कैदी ठेवण्यात आले असून, यामध्ये अंडरवर्ल्ड गॅगस्टर्स बरोबरच लष्कर ए-तोयबाचा सूत्रधार अबू जुंदालसारख्या दहशतवाद्यांचा समावेश आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कैद्यांची वाढती संख्या लक्षात घेता पहारा देणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या केवळ १५० असून कारागृहाची सुरक्षा, कैद्यांच्या अंतर्गत कारावायांवर लक्ष ठेवणे तसेच सर्वसाधारण शिस्तपालन याकरिता उपलब्ध कर्मचारी अपूरे असल्याने कर्मचाऱ्यांची संख्या ४००० इतकी वाढविण्याबाबत तुरुंग प्रशासनाने वारंवार मागणी करूनही ती मान्य न झाल्याने कारागृहातील बेकायदेशीर कारवाया तसेच कर्मचाऱ्यांवरील कामाचा ताण वाढण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१२-२०१५) :**(१) होय, मुंबई मध्यवर्ती कारागृहाची अधिकृत बंदी क्षमता ८०४ आहे. सद्यस्थितीत कारागृहात २७५३ बंदी बंदीस्त आहेत. बंदी अबू जुंदाल हा लष्कर ए-तोयबाशी संबंधित असलेला बंदी मुंबई मध्यवर्ती कारागृहात बंदीस्त आहे.
(२), (३) व (४) १) मुंबई मध्यवर्ती कारागृहाची अधिकृत बंदीक्षमता ८०४ असून त्यानुसार

कारागृहाचे आस्थापनेवर रक्षक संवर्गीय कर्मचारी पदावर कारागृह शिपाई ते सुभेदार यांची १५९ पदे मंजूर असुन सद्यस्थितीत १५७ पदे कार्यरत आहेत. सदरची मंजूर पदे ही कारागृहाचे अधिकृत बंदीक्षमता ८०४ चे प्रमाणामध्ये निश्चित करण्यात आली आहे. परंतु सद्यस्थितीत या कारागृहात २७५३ बंदी बंदीस्त आहेत. त्यामुळे कारागृहातील उपलब्ध कर्मचाऱ्या ताण वाढत आहे, हे खरे आहे.

(२) सद्यस्थितीत उपलब्ध कर्मचारी यांचेवर कामाचा ताण वाढला असला तरी कारागृह सुरक्षा व्यवस्था चोख ठेवण्यात येत आहे. वाढत्या बंदीसंख्येमुळे व अपुऱ्या कर्मचारी बळामुळे कारागृहातील बंद्यांच्या काही वेळा प्रभावीपणे झडत्या होत नाहीत. परंतु कारागृह महानिरीक्षक कार्यालयामार्फत कारागृहाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना त्याबाबत पर्यवक्षण करणेसंदर्भात सुचित केले आहे.

(३) त्यानुसार कारागृह अधिक्षक यांनी त्यांचे नियंत्रणाखाली जास्तीत जास्त झडत्या घ्याव्यात तसेच कारागृह उपमहानिरीक्षक यांनी त्यांच्या नियंत्रणाखालील जास्तीत जास्त झडत्या घ्याव्यात तसेच कारागृह उपमहानिरीक्षक यांनी त्याच्या नियंत्रणाखालील किमान एक कारागृहाची आठवड्यातून सुरक्षेच्या दृष्टिकोनातून तपासणी करण्याबाबत कारागृह महानिरीक्षक कार्यालयामार्फत निर्देश दिलेले आहेत.

(४) कारागृह विभागाच्या आस्थापनेवर मनुष्यबळाची वाढ होणेबाबत बी.पी.आर.ॲण्ड डी. व मुल्ला समितीच्या अहवालानुसार सहा (६) बंदयामागे एक (१) रक्षक, रजा राखीव व सुरक्षेकरिता ४७६१ पदे नव्याने मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला आहे. सदर पदांना वित्त विभागाची मंजुरी मिळणेपर्यंत प्रथम टप्प्यामध्ये २० टक्के प्रमाणे ९५२ पदे मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचारधीन आहे.

---

## धुळे येथील भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे चक्करबर्डी परिसरातील इमारतीत स्थलांतर करण्याबाबत

**(१७) १६४७१ (३१-०७-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे येथील भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे माहे जून, २०१५ पर्यंत चक्करबर्डी परिसरातील इमारतीत स्थलांतर करण्याबाबत मा.पालक मंत्र्यांनी आदेश दिल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मा.पालक मंत्री यांच्या आदेशाची अंमलबजावणी त्वरीत करण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (११-१२-२०१५) :** (१), (२) व (३) श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे तसेच सर्वोपचार रुग्णालयातील विविध चिकित्सालयीन विभाग लवकरात लवकर, टप्या-टप्याने कोणत्याही प्रकारची रुग्णसेवा खंडीत होणार नाही याची दक्षता घेऊन चक्करबर्डी येथील परिसरातील इमारतीत स्थलांतरीत करण्याबाबतच्या सूचना माननीय पालकमंत्री, धुळे यांनी दिल्या आहेत हे खरे असून त्या बाबतचा प्रस्ताव सार्वजनिक आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या विचाराधीन आहे.

---

**राज्यातील निवासी डॉक्टरांच्या मागण्यांवर संचालक, वैद्यकीय शिक्षण व सर्व संबंधितांसमवेत घेण्यात आलेली बैठक**

**(१८) १७९१५ (३१-०७-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील निवासी डॉक्टरांच्या मागण्यांवर निर्णय घेण्याठी दिनांक २५ मे, २०१५ रोजी संचालक, वैद्यकीय शिक्षण व सर्व संबंधितांसमवेत बैठक घेण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी केलेल्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय व त्यानुसार उक्त मागण्यांवर शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही,

परंतू मार्ड संघटनेच्या दि. २५ जून, २०१५ च्या निवेदनानुसार दि. ०१ जुलै, २०१५ व दिनांक ०३ जुलै, २०१५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती,

(२) विद्यावेतन वाढ, दरवर्षी शैक्षणिक शुल्कात १० टक्क्याने होणारी वाढीची अट रद्द करणे, निवासी डॉक्टरांची सुरक्षा व्यवस्था, बंधपत्रित सेवा, क्षयरोगा सारख्या गंभीर आजारांकरिता रजा, इत्यादी मागण्या होत्या, सदर मागण्या शासनाच्या विचाराधीन आहेत,

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गर्भपाताच्या औषधांच्या किटची विक्री ऑनलाईन विक्री होत असल्याबाबत**

**(१९) १८११२ (१४-०८-२०१५). श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील**

**(उस्मानाबाद), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **अन्न व औषधी द्रव्ये प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्त्रीभ्रुणहत्त्या राबविली जात असतांना ऑनलाईन औषध विक्रीच्या बेबंद बाजारामुळे गर्भपाताच्या औषधांचे किटही ऑनलाईन विक्रीच्या वेबसाईटवरुन सर्रास सवलतीच्या दरात मिळत असल्याचे माहे एप्रिल २०१५ च्या शेवटच्या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद् नुसार गर्भपाताच्या औषधांच्या किटची विक्री ऑनलाईन होवू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष बापट (०४-१२-२०१५) :** (१) हे खरे आहे. परंतु गर्भपाताच्या औषधांची सर्रास ऑनलाईन विक्री होते आहे हे खरे नाही.

दिनांक २८/४/२०१५ रोजी पनवेल, जि.रायगड येथील एका व्यक्तीने सहायक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, पेण (रायगड) यांना Shopclue.com या ऑनलाईन संकेत स्थळावरुन Mifegest Abortion kit ची त्यांनी डॉक्टरांच्या चिठ्ठीविना ऑर्डर केली असता, त्यांना सदर संकेत स्थळावरुन औषध पुरवठा झाल्याचे कागदपत्र सादर करुन सदर संकेत स्थळावरुन डॉक्टरांच्या चिठ्ठीविना गर्भपाताच्या औषधाची विक्री होत असल्याची तक्रार केली.

(२) होय, चौकशी केली आहे.

(३) सदर तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या चौकशीत Mifegest Abortion Kit Tablets, mfg by M/s zydus Healthcare, East Sikkim with bill of Medicose Pharmacy, AH-२/११, Veerangana Nagar, Jhansi, U.P २८४१२८ औषध पुरवठा दाराकडून प्राप्त झाले असल्याचे आढळून आले.

सबब, मे. शॉपक्लूज व सर्व संबंधितांविरुध्द औषधे व सौदर्य प्रसाधने कायदा १९४० चे उल्लंघन केल्याचे पनवेल शहर पोलिस ठाणे, पनवेल येथे प्रथम माहिती अहवाल (F.I.R.) दाखल करण्यात आला त्याचा क्र. सीआर II.११/२०१५ dt. ०७/०५/२०१५ असा आहे. या प्रकरणी पुढील तपास पोलिसांमार्फत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यामध्ये डॉक्टरांकडून रुग्णांना देण्यात येणारी औषधे चिठ्ठी (प्रिसक्रिप्शन) लिहिण्याचे नियमांचे उल्लंघन करण्यात येत असल्याबाबत**

**(२०) १९४३२ (३१-०७-२०१५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.विलासराव जगताप (जत) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये डॉक्टरांकडून रुग्णांना देण्यात येणारी औषधे चिठ्ठी (प्रिसक्रिप्शन) लिहिण्याचे नियमांचे उल्लंघन करण्यात येत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये व त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉक्टर रुग्णांना महागडी व त्यांना समजणार नाहीत अशा अक्षरात लिहून देत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, औषधे चिठ्ठी (प्रिसक्रिप्शन) लिहिण्याबाबतचे काय नियम आहेत,

(४) असल्यास, सदर नियमांचे उल्लंघन करणाऱ्या डॉक्टरांवर शासनाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-१२-२०१५) :** (१), (२) व (३) भारतीय वैद्यकीय परिषदेने वैद्यक व्यवसायींसाठी आदर्श औषधपत्र नमुना विहित केलेला आहे. तसेच, राज्यातील आयुर्वेद व युनानी औषध पध्दतींच्या व्यवसायींसाठी आदर्श औषधपत्र नमुना विहित करण्याची बाब महाराष्ट्र भारतीय औषध परिषदेच्या विचाराधीन आहे.

परंतु औषधपत्र देण्याच्या संदर्भातील कोणत्याही नियमाचे उल्लंघन होत असल्याचे कोणत्याही अधिकृत यंत्रणेने शासनास कळविलेले नाही.

(४) व (५) हे प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील एम .आय .डी .सी. क्षेत्रातील कायदा व सुव्यवस्था संदर्भात आढावा घेण्याबाबत**

**(२१) १९७१६ (३१-०७-२०१५). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एम. आय. डी .सी .क्षेत्रातील कायदा व सुव्यवस्था संदर्भात आढावा घेण्यासाठी मा. मुख्यमंत्री यांनी दिनांक १३ मे, २०१५ रोजी वा त्यादरम्यान त्यांच्या वर्षा निवासस्थानी बैठक बोलविली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठकीमध्ये मा. मुख्यमंत्री यांनी उक्त क्षेत्रात पोलिस ठाणे उभारण्याचे आदेश दिले हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१६-१०-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही. तथापि राज्यातील औद्योगिक क्षेत्रामध्ये कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच राज्यामध्ये उद्योग स्थापन करणे व उद्योगांचा विकास करण्यामध्ये ज्या नियमबाह्य मागण्या केल्या जातात त्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १३/५/२०१५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या अनुषंगाने ग्रामीण भागासाठी जिल्हा पोलीस अधिक्षक व पोलीस आयुक्तालय असलेल्या जिल्ह्याच्या ठिकाणी पोलीस आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली औद्योगिक क्षेत्राशी संबंधित असलेल्या उपविभागीय अधिकारी (महसूल), महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, जिल्हा कामगार अधिकारी व प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांची समिती गठीत करण्यात आली असून त्यासंबंधी दिनांक २ जुलै, २०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्याच्या ग्रामीण भागात अद्यापही लाखो कुटुंबांकडे शौचालये नसल्याबाबत**

**(२२) २०३९१ (३१-०७-२०१५). श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : तारांकित प्रश्न क्रमांक ६९७७ ला दिनांक १६ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने हागणदारी मुक्त योजना राबवून ग्रामीण भागात घरा घरात शौचालय बांधण्यासाठी अनुदान देऊनही अद्यापही ५६ लाख कुटुंबे व शहरी भागातही २७ टक्के कुटुंबे उघडयावर शौचाला जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचा लाभ मुबलक पाण्याअभावी ग्रामीण भागाचे लाभार्थी घेत नाहीत ही बाब सर्वेक्षणातून निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजना प्रभावीपणे राबविणेसाठी शौचालयाबरोबरच मुबलक पाण्याची व्यवस्था करण्याबाबत सदर योजना प्रभावीपणे राबविणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच राज्य शासनाने स्वच्छ महाराष्ट्र अभियान राबविण्याचा निर्णय घेतलेला असून सदर अभियानाचा कालावधी दिनांक २ ऑक्टोबर, २०१९ पर्यंत राहणार असून या अभियानाचे स्वरूप काय आहे व सदर अभियान कोणत्या यंत्रणांमार्फत राबविण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, याबाबतची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२९-१०-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सन २०१२ मध्ये राज्याच्या ग्रामीण भागात शौचालयाच्या उपलब्ध सुविधांच्या अनुषंगाने सर्वेक्षण करण्यात आले होते. सदर सर्वेक्षणामध्ये ज्या कुटुंबाकडे शौचालयाची सुविधा उपलब्ध नाही अशा कुटुबांची आकडेवारी गोळा करण्यात आली होती.

शौचालयाचा वापर न करण्याच्या कारणांमध्ये मुख्यत: लोकांच्या स्वच्छते प्रती असलेल्या मानसिकतेबरोबर राज्याच्या काही ग्रामीण भागात असलेली पाण्याची कमतरता याबाबीचाही समावेश आहे.

(३) राज्याच्या ग्रामीण भागात पाण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम, जलस्वराज्य प्रकल्प यासारख्या कार्यक्रमांची अंमलबजावणी सुरु आहे.

(४) राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील उघड्यावरील शौचविधी दि.२ ऑक्टोबर, २०१९ पर्यंत बंद करण्याच्या उद्देशाने नगर विकास विभागामार्फत स्वच्छ महाराष्ट्र अभियानाची अंमलबजावणी दि. १५ मे, २०१५ पासून करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अमरावती शहरातील प्रख्यात डॉ.पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयात उघडकीस आलेल्या गुणवाढ प्रकरणाच्या चौकशी समितीबाबत

**(२३) २०६९६ (३१-०७-२०१५). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती शहरातील प्रख्यात डॉ.पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयात उघडकीस आलेल्या गुणवाढ प्रकरणाची चौकशी करण्यासाठी समिती नेमण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार गुणवाढ प्रकरणी जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-१०-२०१५) :** (१) हे खरे आहे, नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील डॉ.एम.एस. व्यवहारे यांच्या अध्यक्षेतेखाली डॉ. अपूर्वा पावडे व डॉ. नामदेव कामडी अशी त्रिसदस्यीय चौकशी समिती नियुक्ती करण्यात आली होती,

(२) प्रथम वर्ष एम.बी.बी.एस. उन्हाळी २०१५ परीक्षेच्या अंतर्गत गुणांसाठी गैरमार्गाचा अवलंब करुन अंतर्गत गुण वाढवलेल्या पाच विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या परीक्षा गैरप्रकार समितीसमोर चौकशीसाठी बोलविण्यात आले होते, त्यांनी दिलेल्या लेखी निवेदन व चौकशी अहवालानुसार सदर विद्यार्थ्यांचे उन्हाळी सत्र २०१५ परीक्षेची सर्व कामगिरी रद्द करण्यात आली असून त्यांना सप्टेंबर, २०१५ मधील पुरवणी परीक्षेपासून वंचित ठेवण्यात आले आहे, तसेच, गैरप्रकाराशी

संबंधित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना परीक्षा गैरप्रकार समितीसमोर पुढील/आगामी बैठकीत बोलविण्यात येणार आहे,
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**काल्हेर (ता.भिवंडी,जि.ठाणे) गावात बनावट औषधे बनविणाऱ्या कंपन्यांवर व गोदामावर छापा टाकल्याबाबत**

**(२४) २०७३४ (०६-०८-२०१५). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काल्हेर (ता.भिवंडी,जि.ठाणे) गावात अहिरंत कंपाऊंडमधील केयूर औषध एजन्सीच्या गोदामावर तसेच बनावट औषधे बनविणाऱ्या कंपनीमध्ये सेंट्रल ड्रग कंट्रोल ऑर्गनायझेशन पथकाने माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान छापा टाकला, हे खरे आहे काय,
(२) तसेच सदर गावात असलेल्या राजलक्ष्मी कम्पाऊंडमधील बनावट औषधे तयार करणाऱ्या कंपन्या आपल्या मालाचे फार्मसी अथवा एजंटद्‌वारे मुंबई,गोवंडी,सिक्कीम,दमण बंगळूरु व इतर अन्य ठिकाणी मार्केटिंग करीत आहेत, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, सदर बनावट औषधांची निर्मिती करणाऱ्या १३ जणांविरोधात नारपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून अद्‌याप कोणालाही अटक केली नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने सदर छाप्यात किती किंमतीचा माल जप्त करण्यात आला वा संबंधितांवर कोणत्या कलमान्वये कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०४-१२-२०१५) :**(१) हे अंशत: खरे आहे.

दि. ११/५/२०१५ रोजी केंद्रिय औषध निरीक्षक, सीडीएससीओ, मुंबई यांनी मे.फायझर लि.,सी ॲन्ड एफ केयुर एजन्सि, काल्हेर, भिवंडी, जि.ठाणे यांचे चौकशीसाठी भेट दिली होती तथापि, छापा टाकलेला नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.

सदर प्रकरणी १४ जणांविरुध्द नारपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून, १ आरोपीला अटक करण्यात आली आहे.
(४) होय, सदर प्रकरणी पोलिसात गुन्हा (FIR No. १-२११/१५ dated २७.५.२०१५) नोंदविला असून एकूण रु. ४६ लाख किंमतीचा औषधी साठा पोलीस व औषध निरीक्षकांनी एकत्रित जप्त केला असून सदर साठा पोलिसाकडे आहे.

संबंधितांविरुध्द औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्याच्या कलम १७ B(b), १७B(d),१७(b), १७(c),r/w, Rule ९६(१) च्या अनुषंगाने कारवाई करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खापरखेडा, कोराडी, पांजरा, येथील विद्युत केंद्रातून निघणा-या राखेमुळे परिसरातील नागरीकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याबाबत**

**(२५) २११३६ (३१-०७-२०१५). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खापरखेडा, कोराडी, पांजरा, येथील विद्युत केंद्रातून निघणा-या राखेमुळे परिसरातील नागरीकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्थानिक नागरीकांनी या प्रकरणी पर्यावरण व संबधित विभागास तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थानिक पर्यावरण अधिकारी व प्रदुषण मंडळ सदर समस्येकडे अक्षम्य दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पर्यावरण विभाग व महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळाने संदर्भात समस्येच्या निवारणाकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२९-१०-२०१५) :**(१) हे अंशत: खरे आहे.
(२) खापरखेडा, कोराडी, पांजरा येथील विद्युत केंद्रामधून उत्सर्जित होणाऱ्या राखेच्या प्रदुषणाबाबत स्थानिक परिसरातील नागरीकांकडून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तक्रारी प्राप्त होत असतात. त्यानुसार सदर उद्योगाचे नियमितपणे निरीक्षण केले जात.
(३) व (४) हे खरे नाही.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने खापरखेड व कोराडी औष्णिक वीज केंद्राना जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ च्या ३३(अ) व हवा (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९८१ च्या ३१ अ अंतर्गत वेळोवेळी निर्देश दिले असून महाजनकोने प्रदूषण नियंत्रणाकरीता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे कालबध्द कृती आराखडा सादर केला आहे. या कृती आराखड्याची अंमलबजावणी करण्याकरिता तसेच संमतीपत्रातील अटी व शर्तीचे पालन करण्याकरीता कोराडी औद्योगिक विद्युत केंद्राने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास रुपये ५० लाखची बँक हमी दिली आहे. तसेच खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास एकूण ७० लाख रुपयाची बँक हमी दिली आहे. वरील दोन्ही प्रकल्पधारकांकडून संमतीपत्रातील कृती आराखड्यातील नमूद कामे पूर्ण न झाल्याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून दोन्ही प्रकल्प धारकांना दिनांक ५/१/२०१३ रोजी कारणे दाखवा नोटीस दिल्या असून त्यांचे बँक हमी जप्त करण्याची शिफारस महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मुख्यालयास केली होती व त्यानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने

दिनांक ८/१/२०१३ रोजी खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राची रुपये १० लाख बँक हमी जप्त केली आहे. तसेच नंतर त्याची २०१४ मध्ये ३० लाखांची बँक हमी जप्त केली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला येथील सर्वोपचार रुग्णालयामध्ये नातेवाईकांच्या सोयीकरिता बांधण्यात आलेल्या धर्मशाळेबाबत**

**(२६) २१४३६ (३१-०७-२०१५). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला येथील सर्वोपचार रुग्णालयामध्ये नातेवाईकांच्या सोयीकरिता बांधण्यात आलेल्या धर्मशाळेच्या जागेवर वैद्यकीय महाविद्यालयाने कैदी, वार्ड, चर्मरोग व डायरिया वार्ड सुरु करण्याचे महाविद्यालय प्रशासनाने आदेश दिले असून त्यास महाराष्ट्र गव्हर्नमेंट नर्सेस फेडरेशनने विरोध करुन त्याबाबत आंदोलनाचाही इशारा दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने याबाबत आपली भूमिका अद्यापपर्यंत स्पष्ट केलेली नसल्यामुळे रुग्णाच्या नातेवाईकांनी याबाबत आपली नापंसती दर्शविली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. विनोद तावडे (११-१२-२०१५) :**(१), (२) व (३) जिल्हा कारागृह अकोला येथील कैद्यांची विशेष वैद्यकीय तपासणी आणि उपचारासाठी सर्वोपचार रुग्णालय अकोला येथे स्वतंत्र वॉर्डची व्यवस्था करण्याबाबत मा. जिल्हा सत्र न्यायालय, अकोला, जिल्हाधिकारी, अकोला तसेच कारागृह प्रशासनाने रुग्णालयास कळविले होते.

तसेच चर्मरोग आणि डायरिया या संसर्गजन्य रोगांनी ग्रस्त रुग्णाकरिता देखील स्वतंत्र वॉर्डची आवश्यकता होती तथापि, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या परिसरात अन्यत्र जागा उपलब्ध नसल्याने केवळ तात्पुरत्या स्वरुपात धर्मशाळेच्या इमारतीमध्ये कैद्यांकरिता स्वतंत्र वॉर्ड तयार करण्यात आला असून चर्मरोग आणि डायरिया रुग्णांकरिता वॉर्ड सुरु करण्याचे रुग्णालयाकडून प्रस्तावित आहे.

भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकानुसार रुग्णालयात आवश्यक ते फेरबद्दल करण्यात येऊन रुग्णालयाकरिता नव्याने ७ इमारती बांधण्याचे नियोजन आहे. सदरचे बांधकाम पुर्ण झाल्यावर वरील कैद्याकरितांचा वॉर्ड तसेच डायरिया आणि चर्मरोगग्रस्त रुग्णाकरिताच्या वॉर्डचे स्थलातंरण नवीन इमारतीत करण्यात येणार आहे. प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र गव्हर्नमेंट नर्सेस फेडरेशनकडून कोणत्याही प्रकारचा विरोध अथवा आंदोलनाचा इशारा रुग्णालय प्रशासनास देण्यात आलेला नाही. तसेच रुग्ण वा त्यांचे नातेवाईक यांच्याकडून देखील नापसंती दर्शक निवेदन प्राप्त झालेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खामगांव जि.बुलढाणा येथील स्वस्त धान्याच्या गोदामात प्रत्येक धान्यांच्या पोत्यात धान्य कमी येत असल्याबाबत**

**(२७) २१६७४ (३१-०७-२०१५). श्री.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) येथील स्वस्त धान्यांच्या गोदामात प्रत्येक धान्यांच्या पोत्यात ३ ते ४ किलो धान्य कमी येत असल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पोत्यामध्ये धान्य कमी येत असल्यामुळे स्वस्त धान्य दुकानदारांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच धान्य कमी यायची कारणे काय आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१५-१२-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जीवरक्षक औषधांची कृत्रिम टंचाई निर्माण केल्याने कंपन्याची मक्तेदारी मोडून काढण्याबाबत**

**(२८) २१९३२ (१७-०८-२०१५). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने काही महत्वाच्या जीवरक्षक औषधांना अत्यावश्यक यादीमध्ये समावेश केल्यानंतर कोल्हापूर, पुणे अशा अनेक ठिकाणी बाजारात सदर औषधांची कृत्रिम टंचाई निर्माण केल्याची बाब माहे मे, २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जीवरक्षक औषधांचा तुटवडा होऊ नये म्हणून शासनाने काय उपाययोजना केली आहे वा करत आहे,

(३) असल्यास, नामांकित कंपन्याची मक्तेदारी काढण्यासाठी व नागरिकांना स्वस्तात औषध उपलब्ध होण्यासाठी जेनेरिक औषध विक्रीला व वापराला गती देण्यासाठी शासनाने काय उपाययोजना केल्या आहेत वा करत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०४-१२-२०१५) :**(१) हे खरे नाही.

तथापि, २० मे, २०१५ रोजी कोल्हापूर येथील दै. पुढारी या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या अशा आशयाच्या बातमीच्या अनुषंगाने अन्न व प्रशासनाने चौकशी केली असता कोल्हापूरसह महाराष्ट्राच्या इतर जिल्ह्यात औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचे आढळले आहे.

(२) व (३) जेनरिक औषध विक्रीसाठी व वापराकरीता गती देण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाकडून पुढील उपाययोजना करण्यात आली आहे.

"औषध विक्रेता ब्रॅन्ड औषधाऐवजी जेनेरिक औषध देऊ शकेल" असा मजकूर डॉक्टरांनी चिठ्ठीमध्ये लिहावा अशी विनंती इंडियन मेडीकल असोसिएशनमार्फत अन्न व औषध प्रशासनाने दिनांक ११/६/२०१२ च्या पत्रान्वये सर्व डॉक्टर्सना केली आहे.

रुग्णालयात डॉक्टरांद्वारे जेनेरिक औषधांचा वापर जास्तीत जास्त करण्यासाठी तसेच शासकीय व निमशासकीय रुग्णालयांमध्ये जेनेरिक औषधे खरेदी करण्याबाबत अन्न व औषध प्रशासनाचे संबंधितांना कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यात शालेय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची रूची वाढावी याकरीता प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी अद्ययावत विज्ञान केंद्र उभारण्याबाबत

**(२९) २१९३४ (१०-०८-२०१५). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शालेय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची रुची वाढावी तसेच त्यांच्या कल्पनांना वाव मिळावा म्हणून प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी अद्ययावत विज्ञान केंद्र उभारण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी श्री.रघुनाथ माशेलकर व श्री.अनिल काकोडकर यांच्यासह इतर शास्त्रज्ञांची मदत घेण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी अद्ययावत विज्ञान केंद्र उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०२-१२-२०१५) :** (१) होय.

(२), (३) व (४) या बाबत अद्याप निर्णय झालेला नाही.

---

### शासकीय वैद्यकीय रुग्णालय व महाविद्यालयात कॅन्सर रोगावर उपचाराकरीता कॅन्सर टर्शरी केअर युनिट मंजूर झाल्याबाबत

**(३०) २२३५० (३१-०७-२०१५). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कॅन्सर ह्या रोगावर उपचाराकरीता शासकीय वैद्यकीय रुग्णालय व महाविद्यालयात कोबाल्ट ह्या जुन्या पध्दतीने उपचार केले जात असून कॅन्सर ह्या रोगावर उपचाराकरीता

शासनाकडून कॅन्सर टर्शरी केअर युनिट मंजुर झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू युनिट त्वरीत सुरु करण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, असल्यास, साधारणत: कैंव्हापर्यंत उक्त युनिट कार्यरत होणे अपेक्षित आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (११-१२-२०१५) :**(१) व (२) कॅन्सर या रोगावरील उपचाराकरिता शासकीय वैद्यकीय रुग्णालय व महाविद्यालयात कोबाल्ट पध्दतीचा वापर करण्यात येतो.

केंद्र शासन पुरस्कृत टर्शरी केअर सेंटर विभागाच्या नियंत्रणाखालील काही रुग्णालयात सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिंधुदुर्ग जिल्ह्याची स्वतंत्र दर्शनिका प्रकाशित करण्याबाबत

**(३१) २२७०६ (३१-०७-२०१५). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग जिल्ह्याची स्वतंत्र दर्शनिका प्रकाशित झाली नसल्याची बाब माहे जून, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिंधुदुर्ग जिल्ह्याची स्वतंत्र दर्शनिका तातडीने प्रकाशित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-०९-२०१५) :**(१) नाही. ही बाब आधीपासूनच अवगत असून जून २०१४ पासून या कामाची प्राथमिक तयारी सुरु झाली आहे.
(२) सिंधुदुर्ग जिल्ह्याची स्वतंत्र दर्शनिका प्रकाशित करण्याची प्राथमिक तयारी यापूर्वीच सुरु झाली असून अंतिमंत: प्रकाशनास अंदाजे तीन वर्षाचा कालावधी लागेल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मारेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील निराधारांना अनुदान देण्याबाबत

**(३२) २३४४६ (३०-०७-२०१५). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), श्री.राजु तोडसाम (अर्णी), प्रा.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मारेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील तहसिल कार्यालयातील निराधारांचे अनेक वर्षांपासूनचे अर्ज गहाळ झाल्यामुळे मागील पाच महिन्यात ७६० निराधार, वृध्द लाभार्थ्यांना अनुदान देण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच, वणी मारेगाव व झरी तालुक्यातील निराधारांना नियमीत अनुदान देण्यात येत आहे काय,

(३) असल्यास, भाग १ व २ बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच निराधार वृद्ध लाभार्थ्यांना अनुदान मिळवून देण्यासाठी दुर्लक्ष करणा-या कर्मचा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१५-१०-२०१५)** :(१) होय, हे खरे आहे.

मारेगाव तालुक्यातील सामाजिक अर्थसहाय्य योजनेअंतर्गातील ७६६ लाभार्थाची प्रकरणे नव्हती तसेच इतिवृत्तावरदेखील या प्रकरणांची नोंद नसल्याने या लाभार्थ्यांचा माहे जानेवारी, २०१५ पासून लाभ बंद केला होता.

(२) होय.

(३) उपरोक्त कारणामुळे अनुदान बंद करण्यात आलेल्या लाभार्थ्यांची मंडळनिहाय शिबीरे आयोजित करुन या शिबीरांमध्ये प्राप्त झालेल्या लाभार्थ्यांची प्रकरणे तयार करुन माहे जुलै, २०१५ पर्यंतचे अनुदान लाभार्थ्यांच्या खात्यात जमा केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पोलादपूर (जि.रायगड) येथे नैसर्गिकरित्या पाणी टंचाईचे निवारण करण्याबाबत

**(३३) २३६३५ (१७-०८-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलादपूर (जि.रायगड) येथे गत २ वर्षामध्ये वनराई बंधारे, सिमेंट बंधारे, समतल चर, वळणबंधारे, मातीबंधारे, लघुपाटबंधारे, धरणप्रकल्प आदी पाणी अडवा व पाणी जिरवा संकल्पनेद्वारे भुपृष्ठाखालील पाण्याची पातळीत वाढ करण्याचे प्रयत्न खुटले असताना जमिनीत पाणी न जिरवातच भूपृष्ठाखाली पाण्याचे साठे शोधून १६ गावे व ९७ वाड्यात विंधनविहीरीद्वारे उवसा करण्याचा नैसर्गिक तत्वाविरोधी आराखडा यंदा राबविण्यात येणार असल्याचे माहे एप्रिल, २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आराखड्यामध्ये तात्पुरत्या नळयोजना घेणे, विंधनविहीरी जलमंजन, बुडक्या डवरा घेणे सार्वजनिक विहीरी खोल करणे व गाळ काढणे, खासगी विहीरी व विधंनविहरी अधिग्रहण करणे, प्रगतीपथावरील योजनांची दुरुस्ती करणे विंधनविहीरीची दुरुस्ती करणे याकामी कोणतीही मागणी आराखड्यात समाविष्ठ करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तालुक्यातील नैसर्गिकरित्या पाणी टंचाईचे निवारण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२३-११-२०१५)** :(१) व (२) हे खरे नाही,

तथापि ग्रामपंचायतीच्या मागण्यांनुसार सन २०१४-१५ च्या आराखडयामध्ये नवीन विंधन विहिरी खोदणे, टँकरने पाणी पुरवठा करणे याव्यतिरिक्त उपाययोजना पाणी
टंचाई कालावधीत कृती आराखडयामध्ये सुचविण्यात आल्या नाहीत,

(३) पोलादपूर तालुक्यामध्ये ग्रामपंचायतीमार्फत श्रमदानातून, ग्रामपंचायत फंडातून बांध घालून पाणी अडविण्यात आले होते,

तसेच भूपृष्ठातील पाणी भूवैज्ञानिक यांचे उद्धवाच्या दाखल्यानुसार व त्यांनी केलेल्या शिफारशीनुसार आवश्यक त्या ठिकाणीच विंधन विहिरी खोदण्याचा कार्यक्रम घेण्यात येत असतो, त्यामुळे नैसर्गिक तत्वविरोधात टंचाई कृती आराखडा तयार करता आलेला नाही,

(४) प्रश्न उद्‌यभवत नाही.

---

**एरंडोल व पारोळा (जि.जळगाव) येथील क्रीडा संकुलाच्या कामाची प्रगती व सद्‌य:स्थितीबाबत**

**(३४) २४०२७ (०६-०८-२०१५). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एरंडोल व पारोळा (जि.जळगाव) येथील क्रीडा संकुलाच्या कामाची प्रगती व सद्‌य:स्थिती काय आहे,

(२) या कामावर आतापर्यंत किती खर्च करण्यात आला आहे,

(३) या क्रीडा संकुलाचे काम त्वरीत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (०८-१०-२०१५)** :(१) तालूका क्रीडा संकुल एरंडोल व पारोळा यांचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येत आहे, एरंडोल तालुका क्रीडा संकुलातील क्रीडागंण समपातळीत करण्याचे काम, वॉल कंपाऊंड व तारेच्या कुंपणाचे काम पूर्ण झाले असून बॅडमिटन हॉलचे बांधकाम सुरु आहे,

पारोळा तालुका क्रीडा संकुलातील क्रीडा संकुलातील क्रीडागंण समपातळीचे काम, कबड्डी, खो खो व इतर विविध खेळांच्या मैदानाचे बांधकाम पूर्ण झाले असून बॅडबिंटन हॉलच्या फ्लोरींगचे काम सुरु आहे,

(२) व (३) तालुका क्रीडा संकुल एरंडोल व पारोळा यांच्या बांधकामासाठी प्रत्येकी रु. १००.०० लक्ष निधी वितरीत करण्यात आला असून यामधून अनुक्रमे रु. ८०.९७ लक्ष व रु. ९२.५४ लक्ष खर्च झाला आहे, सदर तालुका क्रीडा संकुलाची कामे प्रगतीपथावर आहेत.

---

**देवरी (जि. गोंदिया )येथील एम.आय.डी.सी. मध्ये निर्मितीसाठी**
**नविन प्रकल्प सुरु करण्याबाबत**

**(३५) २४०८८ (३१-०७-२०१५). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवरी (जि. गोंदिया) येथील एम.आय.डी.सी. मध्ये निर्मितीसाठी नविन प्रकल्प सुरु करुन येथील नक्षलग्रस्त भागातील युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध होईल, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एम.आय सी, ची जागा ब-याच प्रमाणात रिक्त असून अजुनपर्यंत शासनाने कोणतीही उपाययोजना केलेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१६-१०-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) देवरी (जि.गोंदिया) येथे देवरी विकास केंद्र स्थापन करण्यासाठी महामंडळाने मौजे देवरी व मऱ्हेगाव येथील खाजगी जमिन १५५.९९ हे.आर. व सरकारी जमिन ६.२१ हे.आर अशी एकूण १६२.२० हे.आर. जमिन संपादित केली असून सदर औद्योगिक क्षेत्रात पायाभूत सुविधा निर्माण करुन ८४ भूखंडांचे आरेखन करण्यात आलेले आहे. त्यापैकी, ३६ भूखंडांचे गरजू उद्योजकांना वाटप करण्यात आले आहे. वाटप करण्यात आलेल्या ६ भूखंडांवर उद्योग घटक सुरु असून तेथे ९० लोकांना रोजगार उपलब्ध झालेला आहे. उर्वरित ४३ उद्योजकांना देकारपत्रे निर्गमित करण्यात आली असून प्रस्तावित उद्योग घटकांमध्ये ११३३ लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मावळ तालुक्यातील (जि.पुणे) कार्ला येथील जमिनीवरील**
**एम.आय.डी.सी.चे शिक्के काढण्याबाबत**

**(३६) २४२४२ (३१-०७-२०१५). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मावळ तालूक्यातील (जि.पुणे) २००६ साली कार्ला व परिसरातील आठ गावातील शेतकऱ्यांच्या जमीनीवर महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीसाठी सेझ प्रकल्प निर्माण करण्यासाठी शासनाने अधिसूचना काढून सातबारा उताऱ्यावर “औद्योगिक क्षेत्रासाठी संपादन “असे इतर हक्कात आरक्षण टाकले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानंतर एकवीरा जमिन बचाव आंदोलनाच्या माध्यमातुन शेतकऱ्यांनी एकत्र येत सदर भूसंपादनाला जोरदार विरोध केला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कायद्यात मुदतवाढ देण्याची तरतूद नसतानाही २००९ साली या प्रकल्पाला पुन्हा मुदतवाढ देण्यात आली परंतु त्यानंतर हा प्रकल्प रद्द होऊन अनेक वर्ष लोटली

असतानाही शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावरील इतर हक्कातील शेरे काढण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१६-१०-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मौजे दहिवली येथील क्षेत्राच्या पहाणीचे काम सुरु असताना स्थानिक लोकप्रतिनिधींनी व ग्रामस्थांनी अडथळा आणून पहाणीचे काम बंद करायला भाग पाडले होते.
(३) व (४) कार्ला औद्योगिक क्षेत्रासाठी अधिसूचित करण्यात आलेल्या क्षेत्रास संबंधित खातेदारानी तीव्र विरोध केल्यामुळे अद्यापपर्यंत सदर क्षेत्राची संयुक्त मोजणी होवू शकली नाही. त्यामुळे कार्ला औद्योगिक क्षेत्रासाठी अधिसूचित करण्यात आलेले क्षेत्र वगळण्यासंबंधीचा प्रस्ताव महामंडळाने शासनास सादर केला असून त्यासंबंधीची कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्ह्यातील क्रीडा संकुलाचे काम त्वरीत पूर्ण करण्याबाबत**

**(३७) २४४४२ (०६-०८-२०१५). श्री.अजित पवार (बारामती), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यातील क्रीडा संकुलाचे उद्घाटन दिनांक ७ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्र्यांनी केले असून अद्याप सदरील क्रीडा संकुलाचे काम पूर्ण करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) नसल्यास, सदरील काम प्रलंबित ठेवण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदरील क्रीडा संकुलाचे काम त्वरीत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास, साधारणत: केंव्हापर्यंत उक्त काम पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. विनोद तावडे (०८-१०-२०१५) :**(१), (२) व (३) हे खरे नाही. सदर क्रीडा संकुलाच्या पाहिल्या टप्यातील कामाअंतर्गत प्रेक्षागॅलरी, ८० बेडचे मुला/मुलीचे वसतीगृह, इन्डोअर हॉल, व्यायामशाळा, विद्युतीकरण या बाबींकरीता एकुण रु.३४०.०० लक्ष एवढा खर्च झालेला असून तत्कालीन पालकमंत्री, रायगड जिल्हा यांचे हस्ते दिनांक १५ ऑगस्ट, २००९ रोजी उद्घाटन करण्यात आले आहे. परंतु पाणी पुरवठा अभावी सदर इमारती वापरात येऊ शकल्या नाहीत.
दुसऱ्या टप्यामध्ये विविध खेळाची मैदाने, जलतरण तलाव, अंतर्गत रस्ते व पार्कींग, ४०० मी. धावनपथ व प्लिंथ प्रोटेशन या बाबींकरीता एकुण रु. ४३९.०० लक्ष एवढा खर्च झालेला असून ती कामे पूर्ण झालेली आहेत. सदर क्रीडा संकुलामध्ये पाणी पुरवठा बाबतचे काम वगळता उर्वरित सुविधा उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत. क्रीडा संकुलामध्ये पाणी पुरवठा उपलब्ध

करण्याच्या दृष्टीने दिनांक २८ मार्च, २०१४ रोजी रायगड जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचा तांत्रिक मान्यतेसह १ कोटी ९० लक्ष रुपयांच्या अंदाजपत्रकास संकुलाच्या पाणी पुरवठा योजनेसाठी जिल्हा नियोजन विभागाची प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून दिनांक २८ मार्च, २०१५ च्या आदेशान्वये रु. २५.०० लक्ष निधी पहिल्या टप्प्यात प्राप्त झाला आहे. सदर पाणी पुरवठ्याचे काम प्रगतीपथावर आहे. उर्वरित निधीसाठी मागणी करण्यात आली असून निधी प्राप्त होताच अंदाजे ४ महिन्यात जिल्हा क्रीडा संकुलास पाणी पुरवठा करण्याबाबतचे काम पूर्ण होणे अपेक्षित आहे.

---

**यवतमाळ शहरात अशुध्द पाणी पुरवठा होत असल्याबाबत**

**(३८) २४५७७ (२९-०७-२०१५). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ शहरात महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अंतर्गत शहरातील ४ लाख नागरिकांना सुमारे ३० हजार नळ जोडण्यांद्वारे पाणीपुरवठा केला जातो परंतु २५० च्या वर वॉल लिकेज असल्यामुळे अशुध्द पाणी नळाद्वारे येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या टाकीवरुन पाणी पुरवठा केला जातो तेथील पाच वॉल उघडताच विविध भागात पाणी पोहोचविले जाते पण त्याच मुख्य पाच वॉलचा संपुर्ण भाग घाण पाण्याने व्यापलेला आहे व त्यातून शहरातील ४ लाख नागरिकांना अशुध्द पाण्याचा पुरवठा होतो व सदर अशुध्द पाण्यामुळे शहरातील नागरिकांच्या आरोग्यास व जिवीतास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२९-१०-२०१५) :** (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुसेगाव (ता.खटाव, जि.सातारा) येथे पंचतारांकित महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ स्थापन करण्याबाबत**

**(३९) २४७८१ (३१-०७-२०१५). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुसेगाव (ता.खटाव, जि.सातारा) येथे पंचतारांकित महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ स्थापन करण्याची मागणी तेथील लोकप्रतिनिधींनी २ वर्षापूर्वी मा.तत्कालिन मंत्र्यांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बाबतचा प्रस्ताव प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ कोल्हापूर यांनी शासनाकडे २ वर्षापूर्वी पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१६-१०-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) नियोजित खटाव औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यासाठी २५०१.१५ हे.आर. खाजगी व २१.१८ हे.आर सरकारी असे एकूण २५२२.३३ हे.आर. क्षेत्रास प्रकरण ६ च्या तरतुदी लागू करण्यासंबंधीच्या प्रस्तावास उच्चाधिकार समितीने मान्यता दिलेली आहे. तथापि समितीने पाण्याचे आरक्षण प्राप्त झाल्यानंतर ५ वर्षात भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण करण्याचे निदेश दिले आहेत.

केंद्र शासनाच्या नवीन भूमी अधिग्रहण कायद्यानुसार सदर क्षेत्रास प्रकरण ६ च्या तरतुदी लागू करण्यासंबंधी विधी व न्याय विभागाचे अभिप्राय प्राप्त करुन सदर क्षेत्रासाठी जमिनी अधिसूचित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अर्जुनी (ता.कागल, जि.कोल्हापूर) येथील शेतक-यांच्या सातबारावर उद्योगक्षेत्र किंवा औद्योगिक वसाहत अशा नोंदी करण्यात आल्याबाबत**

**(४०) २५०३८ (०६-०८-२०१५). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अर्जुनी (ता.कागल, जि.कोल्हापूर) येथे नव्याने आखणी केल्या जाणाऱ्या औद्योगिक वसाहतीसाठी संबंधित शेतकऱ्यांची कोणतीही पूर्वसुचना अथवा चर्चा न करता तसेच मार्च, २०११ मध्ये शासनाने थेट अधिसूचना काढून संबंधित शेतकऱ्यांच्या सातबारावर उद्योगक्षेत्र किंवा औद्योगिक वसाहत अशा नोंदी करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे या शेतकऱ्यांना आपल्या हक्काच्या शेतात विहीर, पाणी योजना, यासह खतांसाठी पीककर्ज मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, संपादित करण्यात येणाऱ्या जमिनीवरील एकमेव शाळाही जाणार असल्याने तेथील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१६-१०-२०१५) :**(१) अर्जुनी (ता.कागल, जि.कोल्हापूर) येथे औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यासाठी मौजे अर्जुनी येथील २४३.१७ हे.आर. खाजगी व ४.५३ हे.आर. सरकारी असे एकूण २४७.७० हे.आर. क्षेत्र अधिसूचित करण्याची अधिसूचना दिनांक २४/३/२०११ च्या

शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने ७/१२ च्या उता-यावरील इतर हक्कात औद्योगिक क्षेत्रासंबंधीच्या नोंदी घेण्यात आल्या आहेत.
(२) भूसंपादनाची प्रक्रिया सुरु असताना काही प्रमाणात निर्बंध येवू शकतात.
(३) व (४) अर्जुनी (ता.कागल, जि.कोल्हापूर) येथे औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यासाठी अधिसूचित करण्यात आलेल्या क्षेत्राची संयुक्त मोजणी करताना जर शाळेच्या क्षेत्राचा समावेश असेल तर ते वगळण्याची दक्षता घेण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**औरंगाबाद येथील घाटी रुग्णालयात मृत झालेल्या मुलाच्या आई-वडिलांना डॉक्टरांनी मारहाण केल्याबाबत**

**(४१) २५८३४ (१७-०८-२०१५). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद येथील घाटी रुग्णालयात उपचारा दरम्यान २२ दिवसांच्या मुलाचा मृत्यू झालेल्या मुलाच्या आई-वडिलांनी डॉक्टरांना जाब विचारल्यावर चिडलेल्या डॉक्टरांनी बेदम मारहाण केली. त्यात मृत मुलाचे वडील बेशुध्द तर आई गंभीर जखमी झाले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित डॉक्टरांवर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (११-१२-२०१५) :** (१) दिनांक २२/५/२०१५ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद येथे श्रीमती सुमय्या यांच्या १४ दिवसांच्या बाळास दाखल करण्यात आले होते. सदर रुग्णाचा दिनांक ३०/०५/२०१५ रोजी उपचारादरम्यान मृत्यू झाल्याने मृताच्या नातेवाईकांनी कक्षामध्ये गोंधळ घालून निवासी डॉक्टरांना धक्काबुक्की केली. सदर ठिकाणी इतर निवासी डॉक्टर देखील जमा झाल्याने काही प्रमाणात तणाव निर्माण झाला होता ही बाब खरी आहे. परंतु सदरची बाब रुग्णालय प्रशासनाने तात्काळ पोलीसांना कळवून पोलीस यंत्रणेमार्फत परिस्थिती नियंत्रणात आणली.
(२) रुग्णांच्या नातेवाईकांकडून अथवा उपचार करणाऱ्या डॉक्टरांकडून रुग्णालय प्रशासनाकडे अथवा पोलीस ठाण्याकडे कोणत्याही प्रकारची लेखी तक्रार करण्यात आल्याची बाब निदर्शनास आली नाही. त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शासकीय धान्य वितरण द्वार पोहोच योजनेतंर्गत शासकीय वाहनावर वाहन चालक म्हणून असलेल्या कर्मचा-यांना शासन सेवेत सामावून घेणेबाबत**

**(४२) २६५०० (३१-०७-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने हंगामी/रोजंदारी/कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या ३२१ कर्मचारी यांना वर्ग ३ व ४ मध्ये सामावून घेतले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच शासन निर्णय संदर्भ क्र.२ अन्वये १०२६४ रोजंदारी मजूरांना शासन सेवेत नियमित घेण्याबाबत तसेच शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्या शासन निर्णयाद्वारे रोजंदारी/मानधनावरील कर्मचारी यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याच अनुषंगाने बीड जिल्ह्यातील दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप मार्केटिंग लिमिटेड अधिकारी यांचेमार्फत शासकीय धान्य वितरण द्वार पोहोच योजनेतंर्गत शासकीय वाहनावर वाहन चालक म्हणून असलेल्या कर्मचा-यांना शासन सेवेत सामावून घेणेबाबत प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय,

(४) असल्यास, याबाबत अंमलबजावणी केव्हापर्यंत करण्यात येणार आहे, नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१५-१२-२०१५) :**(१)हे खरे आहे. महसूल व वन विभागांतर्गत भूकंप पुनर्वसन कक्षाने दि. ११ एप्रिल, २०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये हंगामी रोजंदारी व कंत्राटी तत्वावर नियुक्त करण्यात आलेल्या ३२१ कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेतलेले आहे.

(२) हे खरे आहे. महसूल व वन विभागाने दि. ३१जानेवारी, १९९६ च्या शासन निर्णयान्वये १०,२६४ व दि. १६ ऑक्टोबर, २०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये ५०८९ अधिसंख्य वनमजूरांची पदे निर्माण केली आहेत. तर शालेय शिक्षण विभागाने दि. ०१ मार्च, २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये वस्ती शाळांवर ठोक मानधनावर नेमलेल्या स्वयंसेवकांना नियमित करण्याची कार्यवाही केलेली आहे.

(३) व (४) द्वार वितरण योजनेअंतर्गत राज्यातील अवर्षणप्रवण व आदिवासी विकास क्षेत्रातील रास्त भाव दुकानांना अन्नधान्याची वाहतूक करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ व आदिवासी विकास महामंडळ या संस्थांना अभिकर्ता संस्था म्हणून नेमण्यात आलेले आहे. या कामासाठी या संस्थांना शासनाकडून वाहने पुरविण्यात आलेली होती. या वाहनांचे भाडे शासनाकडून अदा करण्यात येते. या वाहनांसाठी संस्थांकडून कंत्राटी पध्दतीने वाहन चालक नेमण्यात आलेले आहेत.

बीड जिल्ह्यातील ज्या दहा वाहन चालकांनी इतर शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे त्यांनाही सेवेत कायम करण्याची मागणी शासनाकडे केलेली आहे, ते १० वाहनचालक या पध्दतीचा भाग आहेत.

राज्य शासनाने सुधारित धान्य वितरण प्रणाली संपूर्ण राज्यात राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या सुधारित धान्य वितरण पध्दतीनुसार जिल्हास्तरावर एकाच कंत्राटदाराकडून

दोन्ही टप्प्यातील वाहतूक केली जाणार आहे. त्याअनुषंगाने बीड सहीत एकूण १५ जिल्ह्यांमध्ये प्रत्यक्ष वाहतूक सुरु करण्यात आलेली आहे. सुधारित धान्य वितरण प्रणाली ज्या जिल्ह्यात लागू होईल त्या त्या जिल्ह्यातील द्वार वितरण योजना आपोआप संपुष्टात येणार आहे.

त्यामुळे अभिकर्ता संस्था म्हणून नेमलेल्या महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघाने कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या या वाहन चालकांना शासनाने सेवेत सामावून घेण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणात कृषीविषयक अभ्यासक्रमाचा समावेश करण्याबाबत

**(४३) २६७४९ (१०-०८-२०१५). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे ७० टक्के लोक शेती व्यवसायावर अवलंबून असून शेतीला प्राधान्य देण्याची आवश्यकता असल्याने राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणात कृषी विषयक अभ्यासक्रमाचा समावेश आजतागायत करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणात कृषीविषयक अभ्यासक्रमाचा समावेश करण्याबाबत शासन विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाकडून कृषीविषयक अभ्यासक्रमाचा माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणात समावेश करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०२-१२-२०१५) :** (१), (२) व (३) नाही.

इ.९ वी आणि १० वी साठी कार्यशिक्षण विषयांतर्गत शाश्वत शेतीसाठी एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन आणि कृषिशास्त्राची मूलतत्वे व पीकसंवर्धन हे दाने स्वतंत्र विषय आहेत. इ.९ वी च्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विषयाच्या पाठ्यपुस्तकामध्ये दर्जेदार अन्न, दर्जेदार जीवन या प्रकरणात हरित व श्वेत क्रांती, सुधारित पीक उत्पादने, सुधारीत जातीच्या विविध बियाण्यांचा वापर, पिकांची योग्य काळजी घेणे, जलसिंचन, पीक पध्दती, कापणीपूर्व व कापणीनंतर पिकांचे संरक्षण, अन्नधान्याची साठवण, पशुसंवर्धन इ.ची माहिती आहे. उच्च माध्यमिक स्तरावर सामान्य विषयाच्या अभ्यासक्रमात “कृषी आणि तंत्रज्ञान” हा स्वतंत्र विषय आहे. तसेच उच्च माध्यमिक व्यावसायीक अभ्यासक्रमात कृषी व्यावसायिक गटामध्ये Horticulture, Post-Harvest Technology, crop Science, Seed Production Technology, Water Shed management, poultry Production, Dairy Technology या सात विषयांचा तसेच व्दिलक्षी अभ्यासक्रमाच्या (Bifocal) कृषी गटामध्ये शेती विषयाचा समावेश आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील ग्रामीण भागात क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याबाबत**

**(४४) २६७५२ (०६-०८-२०१५). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील युवकांना क्रीडा स्पर्धेत नैपुण्य मिळण्याच्या दृष्टीने ग्रामीण भागात क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाची तातडीने अंमलबजावणी करण्याबाबत शासनाकडून पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-१२-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील तंत्र शिक्षण विभागाच्या डिप्लोमा कॉलेजमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी पूर्वीचे निकष कायम ठेवण्याबाबत**

**(४५) २७४६७ (३०-०७-२०१५). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तंत्र शिक्षण विभागाच्या डिप्लोमा कॉलेजमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी ४५ टक्क्याऐवजी ३५ टक्के गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उद्योग क्षेत्रात मंदिची लाट असल्याने सद्यःस्थितीमध्ये डिप्लोमाधारक व डिग्रीचे शिक्षण घेतलेल्या हजारो तरुणांना नोकरीची संधी मिळणे अवघड झाले असताना डिप्लोमा कॉलेजमध्ये ३५ टक्के गुणांकनावर इंजिनिअर तयार झाले तर त्याचा गुणवत्तेवर परिणाम होवून विकासामध्ये बाधा येवू शकते हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रवेश प्रक्रियेबाबत शासनाने पुनर्विचार केला आहे काय, डिप्लोमा कॉलेजमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी पूर्वीचे निकष कायम ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-०९-२०१५) :** (१) होय.

परंतु सदरचा निर्णय अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद,नवी दिल्ली यांचे कडून घेतलेला असून त्याबाबत त्यांचे Approval Process Handbook २०१२-२०१३ मध्ये नमूद केलेले आहे. त्यानुसार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या निर्णयानुसार शासन व संचालनालयाचे स्तरावरुन प्रवेश प्रक्रीयेची कार्यवाही करण्यात येत आहे.

(२), (३), व (४) राज्यातील मान्यताप्राप्त तंत्रनिकेतनांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे गुणवत्तेचे नियमन अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडील मार्गदर्शक सूचनांनूसार करण्यात येते.

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या Approval Process Handbook २०१२-२०१३ मध्ये नमूद करण्यात आल्यानुसार राज्यातील तंत्रनिकेतनांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे किमान गुण मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरीता ३५% व बिगरमागासवर्गीय विद्यार्थ्यांकरीता ४५% या प्रमाणे निश्चित करण्यात आले आहेत. यामध्ये राज्य शासनाकडून कोणताही बदल संभवत नाही.

---

**केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने साताऱ्यातील मेडीकल कॉलेजची परवानगी नाकारल्याबाबत**

**(४६) २७५०० (३१-०७-२०१५). श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा येथे वैद्यकीय पदवीधरांची संख्या कमी असल्याचे कारण पुढे करुन केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने साता-यातील मेडीकल कॉलेजची परवानगी नाकारली असल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने घेतलेल्या निर्णयाचा फेरविचार करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-११-२०१५) :**(१) हे अंशत: खरे आहे. परंतु, भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकांची पूर्तता पूर्ण न झाल्याने सातारा येथील प्रस्तावित शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची परवानगी भारतीय आयुर्विज्ञान परिषदेने नाकारलेली आहे.

(२) व (३) सातारा येथील प्रस्तावित शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी अद्यापर्यंत भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या निकषांन्वये आवश्यक असलेली जागा ताब्यात आलेली नाही.

---

**उस्मानाबाद, कळंब (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील गावांना चोराखळी साठवण तलावावरुन पाणीपुरवठा योजना तयार करण्याबाबत**

**(४७) २८१७१ (१५-१०-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय ग्रामीण पेयलज कार्यक्रमांतर्गत उस्मानाबाद तालुक्यातील येडशी, जवळा, दुधगाव, तडवळा तसेच कळंब तालुक्यातील शेलगाव, गौर, दहिफळ, वाघोली, शिंगोली, नागझरवाडी, खामसवाडी व गोंविदपूर इत्यादी गावांना चोराखळी साठवण तलावावरुन पाणीपुरवठा योजना

तयार करण्यासाठी दिनांक १ जून, २०१५ रोजीच्या पत्रान्वये शासनाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना सूचित केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जिल्हयातील पाणी टंचाई परिस्थितीचा विचार करता दिनांक २५ फेब्रुवारी, २०१५ रोजी मा.पाणीपुरवठा मंत्री यांच्याकडे झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने घेण्यात आलेल्या सदर निर्णयावर तात्काळ कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व सदर योजनेबाबत पुढील कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०७-१२-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) उस्मानाबाद जिल्ह्यातील उस्मानाबाद व कळंब तालुक्यातील पाणी पुरवठा योजनांबाबत दिनांक २५.२.२०१५ रोजी मा.मंत्री (पा.पु.व.स्व.वि) यांचेकडे बैठक घेण्यात आली. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत उस्मानाबाद व कळंब तालुक्यातील गावांना चोराखळी साठवण तलावावरुन आवश्यकतेनुसार नळ पाणी पुरवठा योजना तयार करण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.
अ) उस्मानाबाद तालुका:-
१) येडशी, दुधगाव, तडवळा (कसबे) या गावांचा राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत कृती आराखडा सन २०१५-१६ मध्ये समावेश करण्यात आला आहे. तथापि शासनाच्या दि. १३.७.२०१५ च्या पत्रानुसार योजना स्थगित ठेवण्यात आल्या आहेत.
२) ग्रामसभा मौ.जवळा (दु) यांनी नळ पाणी पुरवठा योजनेची मागणी केलेली नाही.
ब) कळंब तालुका:-
१) दहिफळ या गावाचा समावेश सन २०१४-१५ च्या कृती आराखड्यात असून या योजनेतील उद्‌भव विहिरीचे काम प्रगतीपथावर आहे.
२) शेलगाव, गोर, वाघोली, शिंगोली, खामसवाडी व गोंविदपूर यांनी ग्रामसभेव्दारे नळ पाणी पुरवठा योजनेची मागणी केलेली नाही.
३) मौ.नागझरवाडी पाणी पुरवठा योजनेचे काम भौतिकदृष्टया पूर्ण करण्यात आले आहे.

---

## उस्मानाबाद शहरात तुळजाभवानी क्रीडा संकुलाच्या आवारातील बांधण्यात आलेल्या जलतरण तलावाच्या सुविधांबाबत

**(४८) २८१९२ (१३-१०-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद शहरातील तुळजाभवानी क्रीडा संकुलाच्या आवारात जलतरण तलावाचे बांधकाम करण्यात आले असून, जनसामान्यांच्या वापरात येण्यासाठी येथे विविध सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत मागणीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (०७-१२-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चेंबूर (मुंबई) येथील अन्न सुरक्षा योजनेतील धान्य काळया बाजारात विक्रीसाठी नेत असताना अन्न व नागरी पुरवठा विभागाने जप्त केल्याबाबत

**(४९) २८२५४ (१५-१०-२०१५). श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चेंबूर (मुंबई) येथील आकाशदीप इमारतीच्या गाळा आणि खोलीत अन्न सुरक्षा योजनेतील१२१ गोणी तांदुळ व ३२ गोणी गहू काळया बाजारात विक्रीसाठी मोटारीमध्ये भरत असताना अन्न व नागरी पुरवठा विभागाने जप्त केला असल्याचे दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी टिळक नगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच गोरगरीबांसाठी असलेल्या धान्याची काळया बाजारात विक्री करण्याचे प्रकार रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०२-१२-२०१५) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ रोजी नियंत्रक शिधावाटप कार्यालयाच्या फिरते पथकाने आकाशदिप बिल्डींग, पेस्तमनगर, चेंबूर येथे अचानक धाड टाकून अन्न सुरक्षा योजनेचा १२१ गोणी तांदूळ व ३२ गोणी गहू अवैधरित्या साठवणूक करुन काळयाबाजारात विक्रीस नेत असताना पकडण्यात आला असून, सदर माल जागीच जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी संबंधितांविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ चे कलम ३ व ७ अन्वये गु.र.क्र. १८८/२०१५ दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ रोजी टिळकनगर पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

(४) सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरीत करण्यात येणाऱ्या अन्नधान्याचे वितरण कोणत्याही प्रकारच्या गैरव्यवहाराशिवाय शिधापत्रिकाधारकांना नियमितपणे उपलब्ध व्हावे, या

करीता राज्यातील प्रत्येक रास्तभाव दुकानाच्या वर्षातून किमान दोनदा व सहा महिन्यातून किमान एकदा नियमित तपासण्या करण्याबाबत शासन परिपत्रक दिनांक १२ जानेवारी, २०१२ अन्वये सर्व संबंधितांना सूचना देण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील वयोवृध्द कलावंताना मानधन देण्याबाबत**

**(५०) २८२५५ (१५-१०-२०१५). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वयोवृध्द लोक कलावंत आणि साहित्यिकांना आर्थिक विवंचनेला तोंड देण्याची वेळ येऊ नये यासाठी सांस्कृतिक कार्य विभागाच्या माध्यमातून अ, ब, क, या वर्गवारीनुसार अनुक्रमे रु.२१०० रु.१८००आणि रु.१५००असे मानधन प्रतिमहा दिले जाते हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २००९ पासून मानधनासाठी अर्ज केलेल्या ३५११ वयोवृध्द कलावंताना अद्याप मानधन देण्यात आले नसल्याचे दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गत ६ वर्षापासून कलावंतांना मानधन न देण्याचे कारणे काय आहेत,
(४) उक्त मानधन त्वरीत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(५) साधारणत: उक्त कार्यवाही केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे?

**श्री. विनोद तावडे (०७-१२-२०१५) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३), (४) व (५) नव्याने पात्र ठरलेल्या कलावंतांना मानधन अदा करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. निधी उपलब्ध होताच नव्याने पात्र ठरलेल्या कलावंतांच्या मानधनासाठी आवश्यक असलेला निधी वितरीत करण्यात येईल.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.